महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
प्रकाशगड, २ रा मजला, प्रो.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ 9736 दिनांक: 17 OCT 2022

## अधिसूचना

**विषय:-** कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता निर्गमित सरळसेवा जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याच्या लिंक (Link) बाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०९/२०२२
२) महानिर्मिती अधिसूचना क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/९५७८ दि.१२.१०.२०२२

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०९/२०२२ अन्वये कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन संदर्भिय क्र.०२ वरील अधिसूचनेन्वये कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांच्या रिक्त पदांकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.३०.१०.२०२२ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

उपरोक्त मुदतवाढीच्या अनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठीची लिंक (Link) खालीलप्रमाणे आहे. तरी, जाहिरातीत नमूद पुर्वावश्यकता पूर्ण करीत असलेले इच्छुक उमेदवार पुढील लिंकद्वारे अर्ज सादर करु शकतात.

**सामान्य उमेदवारांनी (महाराष्ट्र शासन निर्णय दि.१७.१२.२०२१ नुसार वयाची सूट न घेणाऱ्या) अर्ज करण्याकरीता येथे क्लिक करावे.**

**महाराष्ट्र शासन निर्णय दि.१७.१२.२०२१ नुसार वयाची सूट घेणाऱ्या उमेदवारांनी येथे क्लिक करावे.** (उमेदवारांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णय दि.१७.१२.२०२१ अन्वये जे उमेदवार पात्र ठरत आहेत त्यांनीच अर्ज सादर करावा. शासन निर्णय दि.१७.१२.२०२१ मधील तरतूदींनुसार पात्र ठरत नसूनसुध्दा अर्ज केल्यास सदरील अर्ज ग्राहय (वैध) मानण्यात येणार नाही आणि अशा उमेदवारांनी भरलेले ऑनलाईन अर्जाचे शुल्क परत देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी)

तसेच यापूर्वी ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले होते, अशा उमेदवारांनी सध्याच्या मुदतवाढीनुसार नवीन अर्ज सादर केल्यास त्यांचा नवीनतम (Latest) अर्ज भरती प्रक्रियेसाठी विचारात घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याशिवाय एकाच उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज सादर केलेले असल्यास, अशा उमेदवारांचा देखील नवीनतम (Latest) अर्ज भरती प्रक्रियेसाठी विचारात घेण्यात येईल.

(भि.य.मंता)
कार्यकारी संचालक (मासं)

H:\MADHURI BACKUP 22072020\D\RC-2018\PATIL SIR\ON-MARATHI 2022.DOCX